॥ ज्ञा विद्या या विमुक्तये ॥
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED
'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA
Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade
आज़ादी का अमृत महोत्सव

Phone : (02462) 215525 DEPARTMENT OF STUDENTS DEVELOPMENT Website: srtmun.ac.in
Fax : (02462) 215572 E-mail: dir.dsd@srtmun.ac.in

जा.क्र./ वि.वि.वि./ २०२३-२४/२०१ दिनांकः - १३/०१/२०२४

प्रति,

मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये.
मा. संचालक, सर्व शैक्षणिक संकुले ,विद्यापीठ परिसर.
मा. संचालक, विद्यापीठ उपपरिसर, पेठ ,लातूर .
मा. संचालक, विद्यापीठ उपपरिसर, परभणी.
मा. प्राचार्य, न्यू मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली.
मा. समन्वयक, कै. उत्तमराव राठोड आदिवासी विकास व संशोधन केंद्र किनवट.

विषय : - महाविद्यालयीन युवक-युवतींना रोजगारक्षम बनविण्यासाठी आपल्या महाविद्यालयामध्ये कौशल्य विकास केंद्र स्थापन करणेकरीता पुढाकार घेणेबाबत...

संदर्भ: १) डॉ. रामास्वामी एन. भा. प्र. से. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी यांचे पत्र दिनांक ०१/०१/ २०२४

महोदय,

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, (भारत देशाला संबंध जगाची कौशल्य राजधानी बनविण्याचा संकल्प मा. प्रधानमंत्री महोदय श्री. नरेंद्र मोदीजी यांनी सन २०१४ मध्ये जाहीर केला आहे.) रोजगाराबाबत बदलत्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिस्थितीत कौशल्य विकास व उद्योजकतेस अधिक प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्य शासनाने माहे जानेवारी २०१५ मध्ये स्वतंत्र कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाची स्थापना केली आहे. बेरोजगार उमेदवारांना विविध क्षेत्रांमधील रोजगार उपलब्ध करुन देणे, स्वयंरोजगार करु इच्छिणा-या उमेदवारांना अर्थसहाय्य प्रदान करणे, कौशल्य विकास प्रशिक्षणाच्या माध्यमातून उमेदवारांना रोजगारक्षम बनविणे ही सध्याच्या काळाची गरज पूर्ण करण्याच्या हेतूने राज्य शासनाच्या तसेच केंद्र शासनातील विविध विभागांतर्गत कौशल्य विकास प्रशिक्षणाशी निगडीत सर्व योजना व कार्यक्रमांखाली निधीची सांगड घालून एकात्मिक अंमलबजावणीद्वारे कार्यप्रवण वयोगटातील (१५-४५ वर्षांपर्यंतच्या वयोगटातील) उमेदवारांचे अधिक मागणी असलेल्या क्षेत्राच्या आवश्यकतेनुसार व्यावसायिक कौशल्य विकास (Skill Development), कौशल्य वर्धन (Up-skilling), पुनकौशल्य विकास (Reskilling) करण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी मार्फत केंद्र, राज्य व जिल्हा पुरस्कृत विविध कौशल्य विकास प्रशिक्षण योजनांच्या माध्यमातून राज्यातील १५ ते ४५ वयोगटातील युवक-युवतींना विविध ३७ क्षेत्रामध्ये (बँकिंग, माहिती तंत्रज्ञान, बांधकाम, ईलेक्ट्रॉनिक्स इ.) कौशल्य प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगारक्षम बनवून रोजगार अथवा स्वयंरोजगाराच्या संधी पुरविण्यात येतात.

P.T.O.

त्या अनुषंगाने सलग्न पत्रानुसार आपल्या महाविद्यालयात कौशल्य प्रशिक्षण केंद्र स्थापन करून १५ ते ४५ वयोगटातील युवक- युवतींना कौशल्य प्रशिक्षण प्रदान करून त्यांना आपल्या पायावर उभे राहण्यासाठी रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होऊ शकतात. राज्य शासनामार्फत कौशल्य प्रशिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांना निःशुल्क स्वरूपात प्रदान करण्यात येईल. या करीता केंद्र शासनामार्फत निश्चित केलेल्या Common Cost Norms नुसार कौशल्य विकास केंद्रांना विविध टप्प्यांमध्ये सरासरी रु.१५०००/- पर्यंत प्रशिक्षण शुल्क अदा करण्यात येते. राज्यातील १०० नामांकित महाविद्यालयांमध्ये कौशल्य विकास केंद्र स्थापन करण्याचा राज्य शासनाचा मनोदय आहे. या करीता गुगल फॉर्म लिंक तयार करण्यात आली असून त्याद्वारे आपल्या महाविद्यालयामध्ये "कौशल्य विकास केंद्र स्थापन करण्यासाठी दि. २६ जानेवारी, २०२४ पर्यंत अर्ज करावयाचा आहे. आपणास विनंती /आवाहन करण्यात येते कि, गुगल फॉर्म लिंक वरील आवश्यक ती माहिती भरावी व सदर योजनेसाठी अर्ज विहित मुदतीत अर्ज करावा. तरी यासंदर्भात आपल्या स्तरावरून कार्यवाही करावी ,ही विनंती.

[Google फॉर्म लिंक: https://forms.gle/kS13TCXw7LbeaC3n8]

डॉ. सूर्यप्रकाश जाधव
संचालक,
विद्यार्थी विकास विभाग.

प्रत महितीस्तव:
श्री. अजय दर्शनकार, सिस्टिम एक्सपर्ट (संगणक विभाग) यांना देऊन कळविण्यात येते की, सदर परिपत्रक संकेतस्थळावर ठेवण्यात यावे.

महाराष्ट्र शासन
कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग
# महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी
पहिला मजला ,एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय परिसर,
३ ,महापालिका मार्ग ,धोबी तलाव, मुंबई - ४००००१
ईमेल: ceo@mssds.in
दूरध्वनी क्र. ०२२- २२६२५६५१/५३

जा.क्र. MSSDS/२०२३-२४/ ११

दि:०१/०१/२०२४

प्रति,
प्रिय प्राचार्य,

**विषय-महाविद्यालयीन युवक-युवतींना रोजगारक्षम बनविण्यासाठी आपल्या महाविद्यालयामध्ये कौशल्य विकास केंद्र स्थापन करणेकरीता पुढाकार घेणेबाबत...**

भारत देशाला संबंध जगाची कौशल्य राजधानी बनविण्याचा संकल्प मा. प्रधानमंत्री महोदय श्री.नरेंद्र मोदीजी यांनी सन २०१४ मध्ये जाहीर केला आहे. रोजगाराबाबत बदलत्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिस्थितीत कौशल्य विकास व उद्योजकतेस अधिक प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्य शासनाने माहे जानेवारी २०१५ मध्ये स्वतंत्र कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाची स्थापना केली आहे.

बेरोजगार उमेदवारांना विविध क्षेत्रांमधील रोजगार उपलब्ध करुन देणे, स्वयंरोजगार करु इच्छिणा-या उमेदवारांना अर्थसहाय्य प्रदान करणे, कौशलय विकास प्रशिक्षणाच्या माध्यमातून उमेदवारांना रोजगारक्षम बनविणे ही सध्याच्या काळाची गरज पूर्ण करण्याच्या हेतूने राज्य शासनाच्या तसेच केंद्र शासनातील विविध विभागांतर्गत कौशल्य विकास प्रशिक्षणाशी निगडीत सर्व योजना व कार्यक्रमांखाली निधीची सांगड घालून एकात्मिक अंमलबजावणीद्वारे कार्यप्रवण वयोगटातील (१५-४५ वर्षांपर्यंतच्या वयोगटातील) उमेदवारांचे अधिक मागणी असलेल्या क्षेत्राच्या आवश्यकतेनुसार व्यावसायिक कौशल्य विकास (Skill Development), कौशल्य वर्धन (Up-skilling), पुनर्कौशल्य विकास (Reskilling) करण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी मार्फत केंद्र, राज्य व जिल्हा पुरस्कृत विविध कौशल्य विकास प्रशिक्षण योजनांच्या माध्यमातून राज्यातील १५ ते ४५ वयोगटातील युवक-युवतींना विविध ३७ क्षेत्रामध्ये (बँकिंग, माहिती तंत्रज्ञान, बांधकाम, ईलेक्ट्रॉनिक्स इ.) कौशल्य प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगारक्षम बनवून रोजगार अथवा स्वयंरोजगाराच्या संधी पुरविण्यात येतात.

National Skills Qualification Framework (NSQF) अन्वये स्थापित मानकांनुसार १२०० पेक्षा अधिक व्यावसायिक अभ्यासक्रमाचे संबंधित प्रशिक्षण संस्थांमार्फत उमेदवारांना प्रशिक्षण देण्यात येत असून सदर कौशल्य प्रशिक्षण NCrF प्रणालीशी निगडीत आहे. प्रशिक्षणाअंती उमेदवारांचे मूल्यमापन (Assessment) आणि प्रमाणीकरण (Certification) हे केंद्र शासनाच्या National Council for Vocational Education Training-NCVET, National Skill Development Corporation-NSDC आणि Sector Skill Councils (SSC) कडील मान्यताप्राप्त मूल्यमापन संस्था (Assessing Body) मार्फत करण्यात येते. सदर प्रमाणपत्र राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यताप्राप्त असून ह्या अभ्यासक्रमांमध्ये Vertical व Horizantal Mobility अंतर्भूत आहे.

आपल्या महाविद्यालयात कौशल्य प्रशिक्षण केंद्र स्थापन करून १५ ते ४५ वयोगटातील युवक-युवतींना कौशल्य प्रशिक्षण प्रदान करून त्यांना आपल्या पायावर उभे राहण्यासाठी रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होऊ शकतात. राज्य शासनामार्फत कौशल्य प्रशिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांना नि:शुल्क स्वरूपात प्रदान करण्यात येईल. या करीता केंद्र शासनामार्फत निश्चित केलेल्या Common Cost Norms नुसार कौशल्य विकास केंद्रांना विविध टप्प्यांमध्ये सरासरी रु.१५०००/- पर्यंत प्रशिक्षण शुल्क अदा करण्यात येते.

राज्यातील १०० नामांकित महाविद्यालयांमध्ये कौशल्य विकास केंद्र स्थापन करण्याचा राज्य शासनाचा मनोदय आहे. या करीता गुगल फॉर्म लिंक तयार करण्यात आली असून त्याद्वारे आपल्या महाविद्यालयामध्ये "कौशल्य विकास केंद्र" स्थापन करण्यासाठी दि.२६ जानेवारी, २०२४ पर्यंत अर्ज करावयाचा आहे.

आपणास विनंती/आवाहन करण्यात येते कि, गुगल फॉर्म लिंक वरील आवश्यक ती माहिती भरावी व सदर योजनेसाठी अर्ज विहित मुदतीत अर्ज करावा.

[Google form link: https://forms.gle/kS13TCXw7LbeaC3n8]

आपला

(डॉ. रामास्वामी एन. भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी